# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

शासकिय तंत्र निकेतन परिसर, सदर, नागपूर.

दुरध्वनी क्रं.-२५६५१४३
फॅक्स क्रं.- ०७१२-२५६१६६३

E-mail: ronagpur.dte@gmail.com
Web Site :- www.rdtenagpur.org.in

**महत्त्वाचे/कालमर्यादित**

क्रमांक :- तंशिस/प्राकाना/शैवि/२०१४-१५/ 2168
दिनांक:- 8 JUL 2014

प्रति,
संचालक / प्राचार्य
सर्व पदवी, पदव्युत्तर पदवी संस्था व तस्सम संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

**विषय :- व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थामधील शिक्षकीय पदाबाबत.**

विद्यापीठाद्वारे दि. ३०/०५/२०१४ रोजीच्या अधिसुचनेद्वारे सर्व महाविद्यालयांना त्यांच्याकडे सुरू असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमात शिखर संस्थेच्या निकषाप्रमाणे आवश्यक असलेल्या शिक्षकांना ५०% पुर्णवेळ विद्यपीठ मान्यता प्राप्त शिक्षकांची नियुक्ती झाली असेल अश्याच अभ्यासक्रमाची यादी केंद्रभुत प्रवेश प्रक्रियेत समाविष्ट करण्याकरिता तंत्रशिक्षण संचालनालयास प्रवेश प्रक्रिया सुरू होण्या अगोदर बंधनकारक आहे. अधिसुचनेमधील अटींचा भंग होऊन विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यांत आल्यास त्याची संपुर्ण कायदेशिर जबाबदारी संबंधीत महाविद्यालयाची राहील व संबंधीत महाविद्यालयाद्वारे चुकीची माहिती सादर केल्यामुळे कोणतेही प्रकरण उदभवल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी महाविद्यालयाच्या प्राचार्यांची / व्यवस्थापनाची राहील. असे संबंधीत अधिसुचनेत स्पष्ट करण्यांत आले आहे. तरी आपणांस कळविण्यांत येते की शैक्षणिक वर्ष २०१४-१५ च्या प्रवेशाकरीता उपरोक्त अधिसुचनेतील अटींचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी व सोबत जोडलेल्या प्रपत्रानुसार रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर हमीपत्र या कार्यालयाला दि. ०९/०७/२०१४ पर्यंत सादर न केल्यास केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत आपल्या संस्थेचा समावेश करण्यांत येणार नाही, याची नोंद घ्यावी.

**सहपत्र :- वरीलप्रमाणे.**

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,
नागपूर.

प्रत:- १. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई, यांना माहितीकरीता मानार्थ सादर.

New Revised Format

# हमीपत्र

आम्ही अध्यक्ष/सचिव, शैक्षणिक संस्था ____________________(शैक्षणिक संस्थेचे नाव) व प्राचार्य/संचालक, ________________________________ (संस्थेचे नाव व संस्थेचा सांकेतांक) शैक्षणिक वर्ष २०१४-१५ च्या प्रवेशासंबंधी खालीलप्रमाणे हमीपत्र सादर करीत आहोत.

हमीपत्र लिहुन देण्यांत येत आहे कि, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठाच्याद्वारे दि. ३०/०५/२०१४ रोजी प्रसिध्द झालेल्या अधिसुचनेप्रमाणे व्यावसायिक अभ्यासक्रमात शिखरसंस्थेच्या निकषाप्रमाणे आवश्यक असलेल्या शिक्षकांच्या ५०% पुर्णवेळ विद्यापीठ मान्यता प्राप्त शिक्षकांची नियुक्ती आमच्या महाविद्यालयात करण्यांत आलेली आहे / करण्यांत येत आहे. तसेच या बाबतीत वेळोवेळी विद्यापीठाने निर्गमीत केलेल्या अटी व शर्तींची पुर्तता करण्यांत येईल व शै.वर्ष. २०१४-१५ च्या प्रवेशासंबंधी कुठल्याही प्रकारचे कायदेशीर प्रकरण उदभवल्यास संस्था सर्वस्वी जबाबदार राहील. आमच्याद्वारे अधिसुचनेमधील अटींचा भंग झाल्यास त्याची संपुर्ण कायदेशीर जबाबदारी सुध्दा संस्थेची राहील.

करिता सबब हमीपत्र लिहुन देण्यांत येत आहे.

दिनांक :- / /२०१४
स्थळ :-

१. अध्यक्ष / सचिव
(व्यवस्थापन समिती)

संस्थेचे नाव व शिक्का.

२. प्राचार्य / संचालक